(४००)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,
मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा ३/झोपुआ/२६८ /२०२५
दिनांक : ०५/०२/२०२५

झोपडपट्टी पुनर्वसन आदेश (अंतिम)

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ क अन्वये अंतिम आदेश

प्रस्तावना -

सि.स.नं.८०१ जुना ८०२, भवानी पेठ, पुणे येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(क) अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

(१) ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे हे सक्षम आहेत ; आणि

(२) ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दि.२९/११/२०२४ रोजीची पूर्वसूचना प्रकरणातील सविस्तर पार्श्वभूमी नमूद करुन महाराष्ट्र शासन राजपत्र डिसेंबर १२-१८, २०२४ मध्ये पृष्ठ क्र.४२ व ४३ वर तसेच दैनिक वृत्तपत्रात दि.०४/१२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, सदरची पूर्वसूचना सर्वसाधारणपणे सर्वांना ठळकपणे दिसून येईल अशा प्रत्यक्ष जागेवर दि.२९/११/२०२४ रोजी डकवून प्रसिध्द करण्यात आली आहे ; आणि

(३) ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली मिळकत ही महानगरपालिकेकडून झोपडपट्टी म्हणून घोषित नसली तरी उप आयुक्त परिमंडळ, विभाग क्र.१, पुणे महानगरपालिका पुणे यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र उप १/१७५२, दि.२४/०५/२०२३ अन्वये सदर ठिकाणी सादर केलेला झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असलेबाबतचा अहवाल व सक्षम प्राधिकारी क्र.१ झोपुप्रा, पुणे यांनी देखील दि.२०/०७/२०२३ रोजी स्थळपाहणी करून दाखल केलेला स्वतंत्र अहवाल सादर केला आहे. तसेच, खाजगी मालकी असलेने सदर मिळकतीचा सदृष्य अहवालाबाबत पुणे महानगरपालिकेकडे पुन:श्च पडताळणी करीता पाठविला असता त्यांचे मार्फत दि.११/११/२०२४ रोजी नव्याने अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालामध्ये प्रस्तावित क्षेत्रातील घरे राहणीमानाच्या दृष्टीने हनिकारक असलेचे व अरुंद गल्ली बोळ असल्याचे तसेच दाट लोकवस्तीचे व धोकादायक असल्याचे नमूद केले आहे. उपरोक्त अहवाल पाहता सदर ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याजोगी परिस्थिती आहे. आणि;

(४) ज्याअर्थी, सदर पूर्वसूचनेची प्रत जागा मालक, पुणे महानगरपालिका यांना देखील देण्यात आली आहे. पूर्वसूचनेद्वारे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. सदरची पूर्वसूचना प्रसिध्द करणेत येवून ३०

दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. अद्यापपर्यंत या कार्यालयाकडे जमीन मालक अथवा इतर कोणाचीही लेखी स्वरुपात हरकत/तक्रार प्राप्त झालेली नाही; आणि

त्याअर्थी, उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता महाराष्ट्र झोपडपट्टीच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

आदेश :-

(१) सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्या संदर्भातील दि.२९/११/२०२४ रोजीची जाहिर नोटीस (झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषीत करण्याची पूर्वसूचना) कायम करुन खालील अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशाविरोधात उक्त अधिनियमाच्या कलम ३(क) मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करणे शक्य आहे.

अनुसूची

झोपडपट्टीचे नाव :- सि.स.नं.८०१ (जुना ८०२), भवानी पेठ, पुणे
महानगरपालिका क्षेत्र :- पुणे महानगरपालिका.

| गाव | स.नं./ सि.स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र (चौ.मी.) (अंदाजे) | चतु:सिमा (मोजणी नकाशानुसार) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| भवानी पेठ, पुणे | सि.स.नं.८०१ (जुना ८०२) | खाजगी | १६७४.८० चौ.मी. | लागू रस्ता | लागू रस्ता, न.भु.क्र. ८०१ ब. | लागू रस्ता, न.भु.क्र.७९८ | लागू रस्ता न.भु.क्र.७९९. |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे
दिनांक :- 05 /02 /२०२५.

(नीलेश गटणे) (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत-

१. मा. आयुक्त, महानगरपालिका आयुक्तालय, पुणे महानगरपालिका - यांना माहितीस्तव.
२. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे -यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव.
३. संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे- झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावा.